लोकमत

epaper.lokmat.com

कोल्हापूर, रविवार, दि. २८ ऑगस्ट २०२२



# नैवेद्य फेस्टिव्हल उत्साहात साजरा

## डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** ताराबाई पार्कातील स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था,कोल्हापूर संचलित डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट येथे गणेशोत्सवानिमित्त नैवेद्य फेस्टिव्हल कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याचे उद्घाटन कृष्णराज महाडिक व मौसमी राहुल आवाडे यांच्या हस्ते झाले.



डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या नैवेद्य फेस्टिव्हलचे उद्घाटन मौसमी आवाडे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी प्राचार्या शुभांगी गावडे, कौस्तुभ गावडे, कृष्णराज महाडिक, धनराज भोसले उपस्थित होते.

या फेस्टिव्हलमध्ये हॉटेल मॅनेजमेंटच्या विद्यार्थ्यांनी पारंपरिक रंगीबेरंगी वेशभूषा करून उत्स्फूर्त सहभाग घेतला. यात महाराष्ट्रीयन, बंगाली, कर्नाटकी, गुलकंद मिठाई, चॉकलेट, स्नोबॉल, गाजर गुलाबजामून, खजुरी मोदक, पुरणपोळी, अंजीर हलवा, अशा ५१ नैवेद्य प्रकारांचे सादरीकरण केले. या फेस्टिव्हलला विश्वराज महाडिक यांनी सदिच्छा भेट दिली. परीक्षक म्हणून जे. बी. बारदेस्कर, राजेंद्र तनपुरे यांनी काम पाहिले. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचे मार्गदर्शन लाभले, तर सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे, धनराज भोसले, आदी मान्यवर उपस्थित होते.

तरुण भारत

रविवार, २८ ऑगस्ट २०२२

# विवेकानंद महाविद्यालयामध्ये नियतकालिकांचे प्रदर्शन सुरू

कोल्हापूर : येथील विवेकानंद कॉलेजमध्ये ग्रंथालयातून रद्द केलेल्या नियतकालिकांचे प्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते झाले. यावेळी जुनी नियतकालिके रद्दीत न घालता वाचकांसाठी अत्यल्प किंमतीत उपलब्ध करुन दिली आहेत. प्रदर्शन ३० ऑगस्टपर्यंत असून त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन ग्रंथालयाने केले आहे. ग्रंथपाल डॉ. नीता पाटील यांनी प्रास्ताविक केले. सहाय्यक ग्रंथपाल हितेंद्र साळुंखे यांनी आभार मानले. यावेळी जिमखाना विभागप्रमुख प्रा. किरण पाटील, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समिर पठाण, स्टाफ, विद्यार्थी उपस्थित होते.

28.8.2022

दैनिक महासत्ता इचलकरंजी

रविवार, ता.२८ ऑगस्ट २०२२

# कोल्हापुरात आज मेगा जॉब फेअरचे आयोजन

कोल्हापूर,ता.२७(प्रतिनिधी)-

दोन वर्षाच्या कोरोना काळात अनेकांच्या नोकऱ्या गेल्या, रोजगारावर पाणी सोडावे लागले. भारत हा महासत्ता उदयास येताना, रोजगार निर्मिती हे या देशासमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. किंबहुना बेरोजगारीचा मुद्दा सर्वच राजकीय पक्षांसमोर मोठी समस्या म्हणून समोर येतो. अशा वेळी पश्चिम महाराष्ट्रातील युवक-युवतींना रोजगार, नोकरी मिळावी, यासाठी कोल्हापुरात भीमा मेगा जॉब फेअरचे आयोजन केले आहे.




रविवार ता. २८ ऑगस्ट रोजी स्वामी विवेकानंद महाविद्यालयाच्या परिसरात भीमा मेगा जॉब फेअर होणार आहे. पश्चिम महाराष्ट्रात पहिल्यांदाच भव्य प्रमाणात होणाऱ्या मेगा जॉब फेअरसाठी, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे सहकार्य मिळाले आहे. या भीमा मेगा जॉब फेअरसाठी सुमारे २०० कंपन्यांचे अधिकारी आणि प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. तर सुमारे १० हजार उमेदवारांना नोकरी किंवा रोजगार मिळेल, अशी यंत्रणा राबत आहे. रविवार दि. २८ ऑगस्ट रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत हा मेगा जॉब फेअर सोहळा होणार असून, त्यासाठी कोणतेही शुल्क नाही. नाव नोंदणीसाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे.

दहावी- बारावी, आयटीआय, डिप्लोमा- डिग्री, पदवीधर, पदव्युत्तर अशा सर्व उमेदवारांना नोकरी मिळण्याची संधी या भीमा मेगा जॉब फेअरमधून मिळणार आहे. रिटेल, बँकिंग, फायनान्स, मॅनेजमेंट, इंजिनिअरींग, टेक्नीकल, नॉन टेक्नीकल, सर्व्हीस इंडस्ट्रीज, हॉस्पिटॅलिटी, टुरिझम अशा सर्व क्षेत्रातील नामवंत कंपन्यांचे प्रतिनिधी या मेगा जॉब फेअरला उपस्थित राहतील आणि इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेतील. शिवाय जॉब फेअरसाठी उपस्थित उमेदवारांसाठी सुमारे ३ कोटी रूपये किंमतीच्या मुल्यांकन चाचण्या आणि ऑनलाईन शिक्षण अभ्यासक्रम मोफत दिले जाणार आहेत. अर्थात त्यासाठी विद्यार्थ्यांची गुणवत्ता तपासली जाईल. आजवर सुमारे २५ हजार इच्छुकांनी ऑनलाईन रजिस्ट्रेशन केले असून, सुमारे १ हजार स्वयंसेवक, जॉब फेअरच्या यशस्वीतेसाठी राबत आहेत. विश्वराज महाडिक, कृष्णराज महाडिक आणि पृथ्वीराज महाडिक यांच्या परिश्रमातून आणि नियोजनातून या भीमा मेगा जॉब फेअरची तयारी पूर्णत्वास गेली आहे.

28 2022

तरुण भारत
रविवार, २८ ऑगस्ट २०२२

# नियतकालिक स्पर्धेत 'विवेकानंद' प्रथम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्य उत्कृष्ठ वार्षिक नियतकालिक स्पर्धेत विवेकानंद महाविद्यालयाने प्रथम क्रमांक मिळवला. कोरोनामुळे दोन वर्षे नियतकालिक स्पर्धेचा निकाल प्रलंबित होता. हा निकाल नुकताच जाहीर झाला. यामध्ये विवेकानंदच्या विवेक नियतकालिकाने बिगर व्यावसायिक गटात २०१८–१९ मध्ये द्वितीय तर २०१९–२० मध्ये प्रथम क्रमांक पटकावला. महाविद्यालयाने यशस्वी निकालाची परंपरा कायम राखली आहे. दोन्ही नियतकालिकाचे संपादक प्रा. भाऊसाहेब गोसावी आहेत. या यशाबद्दल स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार व रजिस्ट्रार सी. बी. दोडमणी यांनी अभिनंदन केले आहे.